


# पारनेर दर्शन

वर्ष १ अंक ३०८, गुरुवार २९ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये




# आम्हाला राणीताई लंकेच आमदार हव्यात!

## ■ मुंबईस्थित पारनेरकरांचा उमेदवार ठरला ■ दहीहंडीच्या निमित्ताने कामोठेत पारनेरकरांचे शक्ती प्रदर्शन ■ नीलेश लंके प्रतिष्ठान मुंबईच्या दहीहंडीला उस्फुर्त प्रतिसाद

पनवेल : नाना करंजुले

**पारनेरच्या राजकारणामध्ये मुंबईस्थित पारनेरकरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची समजली जाते. त्यातली त्यात कामोठे हे मिनी पारनेर म्हणून ओळखले जाते. मंगळवारी नीलेश लंके प्रतिष्ठान मुंबईच्या वतीने रायगड आणि नवी मुंबईतील सर्वात मोठ्या दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने संपूर्ण शहरांमध्ये बॅनर आणि फलक लावण्यात आले. त्यामध्ये राणीताई लंके यांचे फिवर दिसून आले. आगामी विधानसभेमध्ये त्याच आमच्या उमेदवार असतील आणि आमदार म्हणूनही विधानसभेत सुद्धा ताईच दिसतील हे मुंबईकरांचे एक मत झाल्याचे दिसून आले.**

पारनेर तालुक्यातील हजारो कुटुंब नोकरी व्यवसाय निमित्त मुंबई परिसरामध्ये स्थायिक झालेले आहेत. विशेष करून कामोठे वसाहतीत मोठ्या संख्येने लोक वास्तव्यास आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये काम करत असताना आपली कर्मभूमी मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरात असली तरी पारनेरकर आपल्या जन्मभूमीला विसरले नाहीत. त्यांची तेथील मातीशी नाळ आजही कायम आहे. कित्येक जण गावातील राजकारण आणि समाजकारणामध्ये मुंबईतून सक्रिय आहेत. काही सरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत आहेत. त्याचबरोबर इतर स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सुद्धा मुंबईस्थित पारनेरकर प्रतिनिधित्व करीत आहेत.

या तालुक्यामध्ये मुंबईकरांचे महत्त्व आणि भूमिका अत्यंत निर्णायक ठरते. नीलेश लंके प्रतिष्ठान मुंबई ही संघटना अत्यंत बळकट आणि एकजुटीने गेल्या सहा वर्षापासून उभी राहिलेली आहे. देशाच्या आर्थिक राजधानी बरोबरच इतर ठिकाणी काम करणाऱ्या या प्रतिष्ठानच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबवले जातात. त्याचाच एक भाग म्हणून यंदा सालाबाद प्रमाणे कामोठे येथे लोकनेते दि.बा.पाटील मैदानावर मंगळवारी सर्वाधिक बक्षिसांची दहीहंडी आयोजित करण्यात आली होती. यानिमित्ताने शहरांमध्ये तसेच पनवेल परिसरात स्वागताचे फलक आणि बॅनर लावण्यात आले होते.

खासदार नीलेश लंके यांच्या बरोबरच नगर जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या राणीताई लंके यांना मुंबईकरांनी एक प्रकारे प्रोजेक्ट केल्याचे दिसून आले. हळदी कुंकू समारंभ नंतर राणीताई लंके सुद्धा मुंबईमध्ये सक्रिय झाल्याचे दिसून आले. दरम्यान दहीहंडी उत्सवात अगदी सकाळपासून त्यांनी हजेरी लावली. त्यांच्या हस्तेच हंडीचे पूजन झाले. त्याचबरोबर संगीत भजन आणि महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या होम मिनिस्टर कार्यक्रमालाही राणीताईंनी हजेरी लावली. त्यांचा या कार्यक्रमातील सहभाग पाहता आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये त्याच महाविकास आघाडी कडून उमेदवार असतील अशा प्रकारचे चित्र अडीचशे किलोमीटर दूर असलेल्या कामोठे वसाहतीत दिसून आले.



### श्री दत्त कृपा गोविंदा पथक दहीहंडीचे मानकरी!

नीलेश लंके प्रतिष्ठान मुंबईच्या वतीने आयोजित करण्यात आलेली दहीहंडी आठ थर रचून मानखुर्द येथील श्री दत्तकृपा गोविंदा पथकाने फोडली. खासदार नीलेश लंके आणि राणीताई लंके यांच्या हस्ते विजेत्या पथकाला रोख रकमेचे पारितोषिक आणि चषक देऊन गौरवण्यात आले.

### सेल्फी साठी चढाओढ

खासदार नीलेश लंके यांची संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात क्रेझ आहे. त्यामुळे मंगळवारी दहीहंडी निमित्ताने ते कामोठे या ठिकाणी आले असताना त्यांच्याबरोबर सेल्फी घेण्यासाठी चढाओढ लागली होती. फोटो काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात चाहत्यांनी आणि पनवेलकरांकडून गर्दी करण्यात आली. राणीताई लंके यांच्या सोबतही हजारो महिला आणि नागरिकांनी सेल्फी काढत छबी आपल्या कॅमेऱ्यामध्ये कैद केली.

### होम मिनिस्टर कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद!

श्री नीलेश लंके प्रतिष्ठान मुंबई आयोजित सुप्रसिद्ध राष्ट्रीय निवेदक गणेशजी मोढवे प्रस्तुत, होम मिनिस्टर खेळ पैठणीचा सन्मान महिला वर्गाचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सारिका गणेश नवले यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तर स्नेहल संतोष जुंदरे सुनीता पानसरे यांना अनुक्रमे तृतीय व तृतीय क्रमांक मिळाला.

### राणीताई पारनेर - नगरला उत्तम पर्याय!

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सर्वसामान्य कुटुंब म्हणून लंके परिवाराकडे पाहिले जाते.अत्यंत साधी राहणे असणाऱ्या खासदार नीलेश लंके यांच्या बरोबरच राणीताई लंके या सुद्धा ग्राउंड लेव्हलला काम करतात. गेल्या अनेक वर्षांपासून त्या पारनेर नगरच्या राजकारण आणि समाजकारणात आहेत. पंचायत समिती सदस्य, उपसभापती त्याचबरोबर जिल्हा परिषदेच्या सदस्य म्हणूनही त्यांनी अत्यंत उत्कृष्ट काम केले आहे. केवळ याच विधानसभा मतदारसंघात नव्हे तर संपूर्ण नगर दक्षिण त्यांनी पिंजून काढला. दांडगा अनुभव असणाऱ्या राणीताई लंके याच आमच्या मतदारसंघांमध्ये उत्तम पर्याय असतील अशी प्रतिक्रिया नेरूळ कामोठे स्थित पारनेरकर शैला गुंड यांनी दिली. त्याचबरोबर शालिनी घुले यांनी सुद्धा हेच मत मांडले.

### पहिल्या महिला आमदार मिळणार!

पारनेर नगर विधानसभा मतदारसंघ हा सेनापती बापट, ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे, आदर्श सरपंच पोपटराव पवार, आणि लोकनेते नीलेश लंके यांची जन्म आणि कर्मभूमी आहे. या परिसराने अनेक अधिकारी महाराष्ट्र आणि देशाला दिले आहेत. सहकारातही दुष्काळ असतानाही तालुका अग्रेसर राहिला. त्याचबरोबर उद्योग व्यवसायातही पारनेर अग्रभागी आहे. महिला सबलीकरण आणि सक्षमीकरणातही आम्ही पुढे आहोत. त्यामुळे राणीताई लंके यांच्या रूपाने या मतदारसंघाला महिला आमदार मिळेल अशी प्रतिक्रिया सुवर्णा हाडोळे यांनी दिली.

### मराठमोळ्या लावणी वर तरुणाई थिरकली!

महाराष्ट्राची लोकधारा म्हणून लावणी नृत्याकडे पाहिले जाते. लावणी क्वीन सांजोरी बाविस्कर यांनी लावण्या सादर करत उपस्थित त्यांना जिंकून घेतले. लोकप्रिय लावण्यांच्या बोल आणि तालावर तरुणाई सुद्धा थिरकली.

### शंभरहून अधिक पथकांकडून सलामी!

नीलेश लंके प्रतिष्ठानच्या दहीहंडीला मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि पनवेल परिसरातील शंभरहून अधिक पथकांनी सलामी देऊन मानवी मनोरा रचला. थरांचा थरार पाहण्यासाठी हजारो कामोठेकरांचं पनवेल परिसरातील दहीहंडी प्रेमींनी हजेरी लावली.

# नगर -मनमाड रस्त्याची तातडीने दुरूस्ती होणार

## ■ खासदार नीलेश लंके यांची माहिती ■ ८ कोटी ८५ लाख रूपयांचा निधी मंजुर

नगर : प्रतिनिधी



**दिर्घकाळ प्रतिक्षा असलेल्या नगर-मनमाड रस्त्याची रखडलेली दुरूस्ती अखेर मार्गी लागली असून खासदार नीलेश लंके यांच्या शिष्टाईनंतर या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी ८ कोटी ८५ लाख रूपयांचा निधी केंद्रीय रस्ते मंत्री नितीन गडकरी यांनी मंजुर केला आहे. खा. नीलेश लंके यांनी ही माहीती दिली. दरम्यान या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदारास काळया यादीत टाकण्यात आले असून लवकरच या रस्त्याच्या कामासाठी नव्या ठेकेदाराची नियुक्ती करण्यात येणार असल्याचेही खा. लंके यांनी सांगितले.**

शिर्डीकडे जाणाऱ्या या रस्त्याच्या कामासाठी निविदा मंजुर झाल्यानंतर ३८ टक्के कमी दराने ठेकेदाराने हे काम घेतले होते. त्यामुळे हे काम अनेक वर्षे प्रलंबित राहिले. रस्त्याच्या कामाच्या मागणीसाठी अनेकदा आंदोलने होऊनही हा प्रश्न मार्गी लगला नाही. लोकसभा निवडणूकीनंतर नगर दक्षिण मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार नीलेश लंके हे विजयी झाल्यानंतर त्यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची दि. २२ जून रोजी भेट घेऊन नगर-मनमाड रस्त्याच्या दुरावस्थेकडे लक्ष वेधले होते.

मंत्री गडकरी यांनी खा. लंके यांच्या या मागणीची दखल घेत राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन संबंधित ठेकेदारास निलंबित करून नव्या ठेकेदाराची नियुक्ती करण्याच्या सुचना दिल्या होत्या. मंत्री गडकरी यांच्या आदेशानुसार जुन्या ठेकेदारास निलंबित करण्यात येऊन नव्या ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली आहे. नव्याने काम सुरू होईपर्यंत या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी ८ कोटी ८५ लाख रूपयांचा निधी दि.१० जुलै रोजी मंजुर करण्यात आला. दि.१८ जुलै रोजी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडून जय हिंद बिल्डर्स या एजन्सीला काम देण्यात आले असून लवकरच या कामास प्रारंभ होईल असे खासदार लंके यांनी सांगितले.

### मुळा उजव्या कालव्याची कामे तात्काळ करा

मुळा प्रकल्पांतर्गत मुळा उजवा कालव्याचा समावेश महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत प्रथमच समावेश झाला असून निधीचीही तरतुद झाली आहे. क्षेत्रीय स्थरावर त्यासंदर्भातील काम अतिशय संथ गतीने सुरू आहे. वरीष्ठ कार्यालयाकडूनही त्याबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. विधानसभा निवडणूकीपूर्वी या कामांची निविदा कार्यवाही पुर्ण करण्यात यावी अशी मागणीही खा. लंके यांनी जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिवांकडे पत्राद्वारे केली आहे.

# अजित पवारांनी मागितली महाराष्ट्राची माफी

## ■ छत्रपतींचा पुतळा कोसळण्याची घटना ■ दोषींवर कठोर कारवाई करण्याची दिली ग्वाही



लातूर : प्रतिनिधी

**राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याच्या घटनेमुळे अवघ्या महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणी सरकारवर चौफेर टीकेची झोड उठली असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यासंबंधी जनतेची माफी मागत दोषींवर कठोर कारवाई करण्याची ग्वाही दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा वाऱ्यामुळे पडला. पण या प्रकरणी दोषींवर कारवाई केली जाईल. राज्याचा उपमुख्यमंत्री म्हणून मी राज्यातील १३ कोटी जनतेची माफी मागतो, असे ते हात जोडत म्हणालेत.**

अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसची जनसन्मान यात्रा बुधवारी लातूर येथे पोहोचली. तिथे आयोजित एका सभेत बोलताना अजित पवार म्हणाले की, राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा वेगवान वाऱ्यामुळे पडला. या राज्याचा उपमुख्यमंत्री म्हणून मी राज्यातील १३ कोटी जनतेची माफी मागतो. तसेच या दुर्घटनेतील दोषींवर कठोर कारवाई करण्याची ग्वाहीही देतो. सदर पुतळ्याचे काम चांगल्या दर्जाचे झाले पाहिजे होते. कारण, हे सर्व लोक राष्ट्रनिर्मिती करण्यात अग्रेसर होते. त्यांचे विचार कायमच आपणास प्रेरणा देत असतात. त्यामुळे अशी चूक भविष्यात पुन्हा होणार नाही असा शब्द मी देतो.

**आम्ही कामाची माणसे आहोत**

अजित पवार पुढे म्हणाले की, मी केव्हाही विरोधकांवर टीका केली नाही. कारण, आम्ही कामाची माणसे आहोत. आम्ही १५ हजार कोटींचे विज बील माफ करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. आता त्यांना केवळ शेतातील मोटार चालू करायची आहे. वीज बिलाच्या थकबाकीचा त्यांना कोणताही विचार करायचा नाही.आपल्या राज्याचे बजेट साडे ६ लाख कोटी रुपयांचे आहे. त्यातून आम्ही लाडकी बहीण योजनेसाठी वेगळे पैसे काढले. या योजनेची राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे ही योजना भविष्यातही सुरू राहील.

**महिला सुरक्षेवर हयगय होणार नाही**

अजित पवार यांनी यावेळी बदलापूर येथील अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणाच्या घटनेवरही दुःख व्यक्त केले. ते म्हणाले, बदलापूर येथील घटना दुःखद आहे. सरकार महिलांवरील अत्याचार रोखण्याचा पुरेपूर प्रयत्न करत आहे. महिला सुरक्षेला आमचे कायमच प्राधान्य आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांतील दोषींना फाशी व जन्मठेप सुनावण्यात येईल. अशी विकृती पुन्हा कुणीही करू नये यासाठी संबंधित कायदे आणखी कठोर केले जातील. या प्रकरणी कोणतीही हयगय केली जाणार नाही. विशेषतः कुणी हयगय केली तर त्याला तुरुंगात डांबण्यात येईल.

# प्रा.मधुकर राळेभात यांचा राष्ट्रवादीला रामराम!

## रोहित पवारांच्या कार्यपध्दतीवर टीका | भाजपात जाण्याचे संकेत

कर्जत : प्रतिनिधी

**कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांचे खंदे समर्थक प्रा. मधुकर राळेभात यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला आहे. त्यानंतर आता त्यांना भाजपमध्ये येण्याचे निमंत्रण आमदार प्रा. राम शिंदे यांनी दिले आहे. राळेभात यांनी दोन दिवसांपूर्वी राजीनामा दिल्याची घोषणा करताना आमदार पवार यांच्यावर टीका केली होती.**

राळेभात भाजपमध्ये आले तर त्यांचा योग्य सन्मान केला जाईल, असे म्हणत शिंदे यांनी त्यांना खुले निमंत्रण दिले आहे. कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघात उपमुख्यमंत्री अजित पवार किंवा त्यांचे पूत्र जय पवार हे निवडणूक लढविणार असल्याची चर्चा आहे. तर भाजपकडून राम शिंदे यांचा दावाही सुरवातीपासून कायम आहे. दुसरीकडे विद्यमान आमदार रोहित पवार यांना पाठोपाठ धक्के बसत आहेत. शिवसेना ठाकरे गटाने आधीच बंड पुकारले आहे. त्यानंतर काँग्रेसनेही ही जागा काँग्रेसकडे सोडण्याची मागणी करीत पवार यांना कर्जतऐवजी



बारामतीतून उमेदवारी देण्याची मागणी केली आहे. मनसेही मैदानात उतरण्याच्या तयारी आहे. या पार्श्वभूमीवर सुपारीबाज असा उल्लेख असलेले फलक मतदारसंघात झळकले. पावसाळ्यात कुत्र्याच्या छत्र्या उगवतात, तसे उमेदवारीसाठी कोणीही पुढे येत असल्याच्या आशयाचे फ्लेक्स झळकले आहेत.

हे सुरू असतानाच रोहित पवार यांचे खंदे समर्थक, राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभा प्रचार प्रमुखे मधुकर राळेभात यांनी पक्ष सोडत असल्याची घोषणा केली. त्यांनी म्हटले की, रोहित पवार यांनी कार्यकर्त्यांना दुय्यम वागणूक दिली. गेली ३० वर्ष मी उर्वरीत पान ३ वर







# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## Quick Share!

## ना ॲपची, ना इंटरनेटची गरज

एखादी महत्त्वाची फाइल, कार्यक्रमातील कॅमेरात काढलेले फोटो, जास्त एमबीचे व्हिडीओ कसे शेअर करायचे असा प्रश्न अनेकांना पडतो. स्मार्टफोनमध्ये फाइल्स शेअर करण्यासाठी ब्ल्यूटूथ हा पर्याय असतो, पण ब्ल्यूटूथवरून फाइल्स शेअर करणे कठीण जाते आणि मोठ्या फाइल्स शेअर होण्यास अधिक वेळही लागतो; तर आता तुम्हाला चिंता करण्याची गरज नाही. कारण क्विक शेअरच्या मदतीने तुम्ही सहज फाइल्स शेअर करू शकणार आहात. वर्षाच्या सुरुवातीला,



गूगलने आपल्या 'निअर बाय शेअर' (Nearby Share) फीचरचे नाव बदलून 'क्विक शेअर' (Quick Share) केलं आहे. हे फीचर विंडोज, क्रोमओएस आणि ॲण्ड्रॉइड उपकरणांवर उपलब्ध आहे. हे फीचर वापरकर्त्यांना फोन, डेस्कटॉप, टॅबलेटमधून फोटो, व्हिडीओ, फाइल्स झटपट शेअर करण्यात मदत करते. तसेच खास गोष्ट अशी की, हे फीचर इंटरनेटशिवाय कार्य करते; त्यामुळे मोबाइल डेटा संपेल याचीसुद्धा वापरकर्त्यांना काळजी करण्याची गरज नाही...

### क्विक शेअर कसे वापरायचे...


क्विक शेअर वापरून फाइल्स पाठवण्यासाठी तुम्हाला जो फोटो, फाइल किंवा लिंक इतरांना पाठवायची आहे ती ओपन करा, त्यानंतर शेअर बटणावर क्लिक करा. आता 'क्विक शेअर' या पर्यायावर टॅप करा, तेव्हा तुम्हाला जवळपासच्या डिव्हाइजची यादी दिसेल. जर तुम्हाला जवळपासच्या पर्यायांची यादी दिसत नसेल तर उजवीकडे असणाऱ्या तीन-डॉट मेनूवर टॅप करा आणि 'सेटिंग्ज'वर क्लिक करा. आता, 'Who can share with you'वर टॅप करा आणि 'व्हिजीबल निअर बाय डिव्हाइज' पर्याय चालू (ऑन) करा. यानंतर आपला फोन जवळच्या डिव्हाइसचा शोध सुरू करेल. तुम्हाला कोणत्या डिव्हाइसवर तुमचे फोटो, व्हिडीओ, फाइल शेअर करायचे आहेत, त्या नावावर क्लिक करा. त्यानंतर फोटो, व्हिडीओ प्राप्तकर्त्याला त्यांच्या डिव्हाइसवर फाइल प्राप्त करण्याची एक सूचना दिली जाईल आणि काही वेळातच फाइल ट्रान्सफर होईल. तर अशाप्रकारे तुम्ही काही मिनिटांत इतरांच्या डिव्हाइसवर फाईल्स ट्रान्सफर करू शकता.

## Google Maps चे १० सिक्रेट फीचर्स...




**जगभरातील लोक अनोळखी ठिकाणी पहिल्यांदा प्रवास करताना गूगल मॅप्सचा उपयोग करतात. या ॲपच्या मदतीने ठरावीक ठिकाणे, कमी ट्रॅफिक असणारा रस्ता, आजूबाजूचा परिसर यांची माहिती मिळते. त्यामुळे या ॲपचा आता जगभरात वापर होऊ लागला आहे. पण, याच गूगल मॅपमध्ये अशी बरीच फीचर्स आहेत, जी खूप कामाला तर येतीलच; शिवाय तुमचा युजर एक्स्पिरियन्स आणखी भारी होईल. चला तर याबद्दल सविस्तर जाणून घेऊ...**

- जेमिनी एआय गूगल मॅप्सवर संवाद साधू शकते : गूगल मॅप्स नुकतेच जेमिनीद्वारे जनरेटिव्ह एआय क्षमतेने सुपरचार्ज झाले आहे; जिथे तुम्ही आता फक्त व्हॉइस कमांड वापरून विशिष्ट स्थानावर नेव्हिगेशन सुरू करू शकता. बाईक चालविताना तुम्ही या फीचरचा उपयोग करू शकता.
- इलेक्ट्रिक वाहन सेटिंग्ज : EV वाहन वापरकर्त्यांना चार्जिंग स्टेशन शोधणे सोपे जाईल. फक्त Google Maps वर तुमचा चार्जर टाईप निवडा आणि electric vehicle charging stations near me म्हणजेच माझ्याजवळील इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन शोधा यावर क्लिक करा. तुम्हाला गूगल मॅप्स इलेक्ट्रिक वाहनाशी सुसंगत असलेली जवळपासची चार्जिंग स्टेशन्स हायलाइट करून दाखवेल. मग ते दोन, तीन किंवा अगदी चारचाकी वाहन असो.
- गूगल मॅप्ससह तुम्ही 'Travel back in time' हे प्रवास फीचर वापरून काही वर्षांपूर्वी एखादे ठिकाण किंवा स्थान कसे दिसायचे ते पाहू शकता. लक्षात ठेवा की, हे फीचर केवळ निवडक ठिकाणे आणि स्थानांसाठी उपलब्ध आहे.
- मित्र आणि कुटुंबासह लाइव्ह लोकेशन शेअर करा : गूगल मॅप्स वापरून, तुम्ही तुमचे लाइव्ह लोकेशन मित्र आणि कुटुंबातील सदस्यांबरोबर शेअर करू शकता. नवीन ठिकाणी प्रवास करताना तुम्ही या फीचरचा वापर करू शकता आणि इतरांची मदत घेऊ शकता. तुम्ही विशिष्ट कालावधीसाठी किंवा प्रवास संपेपर्यंतही लाइव्ह लोकेशन शेअर करू शकता. जर लाइव्ह लोकेशन शेअर करणे थांबवायचे असेल, तर तुम्हाला ते मॅन्युअली बंद करावे लागेल. लक्षात घ्या की, हे फीचर तुमच्या स्मार्टफोनच्या बॅटरीवर परिणाम करील.
- वाहन पार्किंगचे ठिकाण सेव्ह करा : बऱ्याच शहरांमध्ये पार्किंगची ठिकाणे शोधणे कठीण जाते. त्यामुळे आपण आपली गाडी कुठे पार्क केली आहे हे लक्षात ठेवणे कठीण जाते. तुम्ही 'सेव्ह युवर व्हेईकल पार्किंग' हे फीचर वापरून तुमच्या वाहनाचे अचूक GPS स्थान चिन्हांकित करू शकता; ज्यामुळे तुम्ही परत आल्यावर कार- बाईक कुठे पार्क केली आहे हे शोधणे सोपे जाईल.



- हवामानाची माहिती मिळवा : तुम्ही ज्या ठिकाणी प्रवास करणार असाल, त्या ठिकाणची रीअल-टाइम हवामानाची थेट माहिती गूगल मॅप तुम्हाला देईल. त्यामुळे अनोख्या ठिकाणी प्रवास करण्यापूर्वी त्या ठिकाणच्या हवामानाचा अंदाज घेता येईल.
- इनडोअर लाइव्ह व्ह्यू : विमानतळ किंवा मोठ्या मॉलमध्ये अनेकदा एकमेकांना शोधण्यात वेळ निघून जातो. कारण येथे नागरिकांची रहदारी मोठ्या प्रमाणात असते. इनडोअर लाइव्ह व्ह्यू या फीचरच्या मदतीने विमानतळ किंवा मॉलमधील विशिष्ट स्टोअर किंवा तुमचे बोर्डिंग गेट सहज शोधू शकता. ही बाब लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, सध्या हे फीचर सध्या फक्त १० हजार ठिकाणांपुरते मर्यादित आहे.
- ऑफलाइन मॅप डाउनलोड करा : प्रवास करताना एक मोठी भीती असते ती म्हणजे कधी नेटवर्क गेले तर; ज्याशिवाय नेव्हिगेशन ॲप बंद होऊ शकते. त्यामुळे प्रवास सुरू करण्यापूर्वी तुम्ही जात असलेल्या ठिकाणचा ऑफलाइन नकाशा डाउनलोड करणे केव्हाही फायदेशीर ठरते. वापरकर्त्यांना गूगल मॅप्सवर विशिष्ट शहरांचे नकाशे डाउनलोड करण्याची सुविधाही मिळते.
- ऑफिस आणि घराचा पत्ता सेव्ह करून ठेवा : ऑफिसला पोहोचायला उशीर झाला असेल, तर कॅब बुक करताना घाई-गडबडीत पत्ता चुकीचा टाकला जाऊ शकतो. त्यामुळे गूगल मॅप्समध्ये घर आणि ऑफिसचा पत्ता सेव्ह करून ठेवा. म्हणजे तुम्ही घराबाहेर पडल्यावर एखादी कॅब बुक करायची असेल, तर तुम्हाला एका क्लिकवर लवकर पोहोचण्याचा जलद मार्ग गूगल मॅप्स दाखवेल.
- एआयसह नवीन ठिकाणे शोधा : सध्या निवडक वापरकर्त्यांसाठी उपलब्ध एआय फीचर गूगल मॅप्सवर नवीन ठिकाणे शोधण्यास मदत करील. तुम्ही पार्टीला जाण्यासाठी नवीन ठिकाणे, किराणा माल खरेदी करण्यासाठी नवीन ठिकाणे गूगल मॅप्सवर शोधू शकता आणि सर्वोत्तम उपलब्ध पर्याय निवडण्यात तुम्हाला एआय मदत करील.

## नाव घ्या, कॉल लागेल...

**काम पटकन व्हावं असं कोणाला वाटत नाही? अशावेळी स्मार्टफोनमध्ये शॉर्टकट्सची मदत घेतली जाते. अनेक लोक असे असतात जे यासाठी शॉर्टकट ॲपचा वापर करता. शॉर्टकट ॲप्समध्ये व्हॉइस डायलिंगसारख्या फीचर्सचा समावेश असतो. त्यामुळे कोणताही फोन नंबर शोधावा लागत नाही. तुम्ही बोलून तो नंबर सहज डायल करू शकता आणि कमांड देऊन त्यावर कॉल करू शकता. यासाठी तुम्हाला फोनला हात लावण्याची देखील गरज नाही. परंतु असे ॲप तुमच्या प्रायव्हसी आणि फोनसाठी सुरक्षित आहेत का? हा एक मोठा प्रश्न आहे, याचा मात्र अनेकजण विचार करत नाहीत आणि जेव्हा पर्सनल डेटा चोरी होतो, तेव्हा डोक्याला हात लावतात. त्यामुळे असे ॲप इंस्टॉल करण्यापूर्वी हजार वेळा विचार केला पाहिजे.**

गुगल प्ले स्टोर आणि ॲप्पल ॲप स्टोरवर अनेक असे ॲप्स उपलब्ध आहेत ज्यांचा वापर केल्याने तुमचं काम पटकन होईल आणि वेळ वाचेल. परंतु हे ॲप तुमच्या संपूर्ण कॉन्टॅक्ट लिस्टसह गॅलरीचा देखील ॲक्सेस मिळवतात. म्हणजे तुमच्या पर्सनल फोटोसह कॉन्टॅक्ट लिस्ट देखील थर्ड पार्टी ॲपच्या हाती जाते. यांचा थेट परिणाम प्रायव्हसीवर होतो. फक्त काही मिनिटे वाचवण्यासाठी तुम्ही तुमची प्रायव्हसी थर्ड पार्टी ॲपच्या हाती गमावता, त्यामुळे डेटा चोरीची शक्यता वाढते. जर तुम्हाला फोन आवाजाने कंट्रोल करायचा असेल तर अँड्रॉइड आणि ॲप्पल डिव्हाइसमध्ये मिळणाऱ्या गुगल असिस्टंट आणि सीरी फीचर्सचा वापर करता येईल. या फीचर्सच्या माध्यमातून तुमचा डेटा लीक होण्याची शक्यता नाही आणि आणि तुम्ही सुरक्षित राहता. अँड्रॉइडवर सर्वप्रथम आपल्या स्मार्टफोनचं पावर बटन प्रेस करा. Google Assistant पावर बटननं ओपन होतं. त्यानंतर स्क्रीनवर Google Assistant दिसू लागेल, आता तुम्ही गुगल असिस्टंटला गुगल हाक मारूनदेखील कमांड देऊ शकता. गुगल तुमची रिक्वेस्ट पूर्ण करेल.

### असं करा इनेबल

जर पावर बटननं असिस्टंट ॲक्टिव्हेट झाला नाही तर फोनमध्ये गुगल ॲप ओपन करा, उजवीकडे तुमच्या प्रोफाईलवर क्लिक करा. त्यानंतर सेटिंग ओपन करा. इथे गुगल असिस्टंटच्या ऑप्शनवर क्लिक करा. त्यानंतर Hey Google आणि Voice Match वर क्लिक करा. त्यानंतर व्हॉइस सिलेक्ट करा आणि इनेबल करा.



### आयफोन युजर्स

आयफोन युजर्स आयफोनमध्ये सीरी फीचर इनबेल करू शकतात आणि आयफोनला स्पर्श न करताच व्हॉइसना कंट्रोल करू शकतात. विशेष म्हणजे ऑथेंटिक ॲप्स व्यतिरिक्त इटकर कोणतेही ॲप वापरणे टाळावे आणि वापरावे लागलेच तर एकदा गुगलवर त्या ॲप्सचे रिव्यू आणि रेटिंग चेक करावे.

## जुना रेफ्रिजरेटर नीट काम करेना?



**उन्हाळ्याने आपले उग्र रूप दाखवायला सुरुवात केली आहे. अशा परिस्थितीत तुमच्या जुन्या रेफ्रिजरेटरने कूलिंग कमी करण्यास सुरुवात केली आहे. याची अनेक कारणे असू शकतात, सामान्यतः असे दिसून येते की फ्रिजमध्ये कूलिंग कमी होण्याचे कारण तांत्रिक नसून सामान्य सवयींमुळे आहे, चला तर मग जाणून घेऊया घरच्या घरी फ्रीजची कूलिंग कशी वाढवता येईल?**

- फ्रीजमधील वस्तूंकडे द्या लक्ष : बरेचदा लोक कमी कॅपिसिटीचा फ्रीज विकत घेतात कारण तो स्वस्त असतो आणि मग त्यात सामान भरून टाकतात. अशा स्थितीत फ्रीजमधील हवेचा प्रवाह योग्य प्रकारे होत नाही. त्यामुळे फ्रीजमध्ये थंडावा कमी होतो. तांत्रिकदृष्ट्या, कोणतेही रेफ्रिजरेटर थंड ठेवण्यासाठी हवेचा प्रवाह आवश्यक असतो. शिवाय, तुमच्याकडे भरपूर सामान असेल तर मोठ्या आकाराचा फ्रीज घ्या, असा सल्लाही दिला आहे.
- तापमानाकडे लक्ष द्या : बरेचदा लोक थंड वातावरणात रेफ्रिजरेटरचे तापमान कमी करतात आणि उन्हाळ्यात तापमान वाढवायला मात्र विसरतात. ज्यामुळे कूलिंगची समस्या उद्भवते. या सामान्य सवयी बदलून कूलिंग वाढवता येते. जर आपण भारताबद्दल बोललो तर रेफ्रिजरेटरचे तापमान उन्हाळ्यात 35-38°F च्या दरम्यान ठेवावे.



- वॉल्व सील तपासा : फ्रीजच्या दारावर रबर असते, जे फ्रीजमधील हवा बाहेर पडू देत नाही. त्यामुळे फ्रीज थंड राहतो, पण जुन्या फ्रीजमध्ये रबर खराब होण्याची समस्या असते. अशा परिस्थितीत, दरवाजा सील तपासा.
- कंडेनसर कॉइल साफ करणे : कंडेन्सर कॉइल म्हणजे रेफ्रिजरेटरच्या मागे जाळीची जाळी आहे. या जाळीमध्ये धूळ आणि कचरा अडकू शकतो. ज्यामुळे रेफ्रिजरेटर थंड करणे कठीण होते. ही कॉइल वर्षातून एकदा तरी ब्रशने स्वच्छ करा.
- मागील फॅन व्हेंट : रेफ्रिजरेटरच्या मागील बाजूस एक छोटा पंखा बसवला आहे, जो गरम हवा बाहेर टाकतो. अशा स्थितीत मागचा पंखा नीट काम करत आहे की नाही हे नेहमी तपासा. पंखा काम करत नसल्यास, फॅन दुरुस्त करण्यासाठी टेक्निशीयनना कॉल करा.

## एसी देईना थंडावा?

**काही वेळा अनेक सर्व्हिसिंग करूनही, एअर कंडिशनर त्याला कूलिंग मिळणे कठीण होते. जेव्हा असे होते तेव्हा युजर्स खूप अस्वस्थ होतात. जर तुम्हाला तुमच्या एअर कंडिशनरमध्ये अशी कोणतीही समस्या येत असेल, तर काही टिप्स फॉलो करून तुम्ही एअर कंडिशनरची कूलिंग वाढवू शकता...**

सर्वप्रथम, तुम्ही तुमचे एअर कंडिशनर कधीही कमीत कमी तापमानात चालवू नये. जर तुम्ही असे केले तर एअर कंडिशनरचे कूलिंग धोक्यात येते आणि काही महिने चालवल्यानंतर, एअर कंडिशनर योग्यरित्या कूलिंग करणे थांबवू शकते. सीझन संपल्यानंतर जेव्हा तुम्ही एअर कंडिशनर वापरणे बंद कराल. तेव्हा तुम्ही एअर कंडिशनरवर एक कव्हर ठेवावे. खरेतर यामुळे एअर कंडिशनरमध्ये कोणत्याही प्रकारची घाण जाण्यापासून प्रतिबंध होतो आणि पुढील हंगामात त्याची गारवा देण्याची क्षमता देखील कायम राहते. केवळ एअर कंडिशनर खरेदी करून काम होत नाही, तर चांगल्या परफॉर्मन्ससाठी ते तुम्हाला ते वेळेवर सर्व्हिसिंग करून घेणे देखील आवश्यक आहे आणि जर तुम्ही असे केले नाही तर एअर कंडिशनरच्या आत घाण साचू लागते आणि त्यामुळे कूलिंग प्रभावित होते आणि एअर कंडिशनर खराब होते. जर तुम्हाला एअर कंडिशनरच्या महत्त्वाच्या भागांबद्दल माहिती असेल तर तुम्ही ते घरीही सर्व्हिसिंग करू शकता. यामध्ये तुम्हाला मोठी रक्कम खर्च करावी लागणार नाही आणि इतर कोणतेही काम करावे लागणार नाही. जर तुम्ही एअर कंडिशनर चालू असताना त्यावर कोणत्याही प्रकारचे कव्हर ठेवले तर तुम्ही तसे करू नये. कारण त्याचा एअर कंडिशनरच्या कूलिंगवर परिणाम होतो.



### ...तर कमी येईल लाईटबील

- उन्हाळा म्हटलं कि एसीचा वापर वाढून जातो. एसीच्या या वाढत्या वापराबरोबरच सुरू होते वीज बिलाची समस्या मग वाढत्या उकाड्या बरोबरच वाढते वीज बिलही हैराण करू लागते. अशा वेळी काही टिप्स फॉलो केल्यास आपण आपले लाईट बिल कमी करू शकतो.
- करा योग्य एसीची निवड : जर तुम्ही नवीन एसी घेत असाल तर तो तुमच्या रूमच्या साईजनुसार अनुकुल आहे याची खात्री करा.
- कुठला एसी निवडावा : साधारणपणे १००० स्क्वेअर फीट एरिया साठी १ टन, १५०० एरियासाठी १.५ टन तर त्याच्यावरती २टन एसीची निवड करावी.
- सर्व्हिसिंग करणे : उन्हाळा सुरू होण्याआधीच एसीची सर्व्हिसिंग करून घ्यावी. कारण आधीचा पूर्ण सीझन एसी बंद असल्याने त्याच्यात कचरा साचतो.
- फिल्टर साफ करणे : एसीचे फिल्टर वेळोवेळी साफ केल्याने एसी अधिक कार्यक्षम राहते. तसेच वेळोवेळी गरजेनुसार फिल्टर बदलून घ्यावे.

## किती जीबी रॅमचा फोन घ्यावा?

**स्मार्टफोन खरेदीवेळी रॅमची निवड एक मोठा आणि महत्वाचा प्रश्न अनेकांना सतावतो. यामुळे अनेकांचा गोंधळ उडतो की त्यांच्यासाठी किती जीबी रॅम असलेला स्मार्टफोन बेस्ट आहे. या प्रश्नाला ठराविक असं उत्तर देणं तसं कठीण काम आहे. कारण प्रत्येकाची गरज वेगळी असते. त्यानुसार रॅमची आवश्यकता बदलते. तुम्ही स्मार्टफोन किती आणि कशासाठी वापरता यावर या प्रश्नाचे उत्तर अवलंबून असते.**

- जर तुम्ही फोन अत्यंत बेसिक कामांसाठी म्हणजे कॉल, मेसेज, वेब ब्राउजिंग, सोशल मीडियासाठी वापरण्यासाठी करत असाल तर तुमच्यासाठी ४ जीबी रॅम असलेला फोन बेस्ट ठरेल. जर तुम्ही फोनमध्ये गेमिंग, व्हिडीओ एडिटिंग असं मल्टीटास्किंग करत असाल तुमच्यासाठी ६ जीबी ते ८ जीबी रॅम असलेला स्मार्टफोन योग्य ठरेल. जर तुम्ही हेव्ही गेमिंगसाठी फोन वापरत असाल तसेच ४ के व्हिडीओ एडिटिंग करत असाल तर तुमच्यासाठी १२ जीबी रॅम असलेला फोन हवाच.
- प्रोसेसर किती हवे? : कोणत्याही फोनच्या स्पीडसाठी प्रोसेसर देखील तितकाच महत्वाचा आहे. म्हणून चांगला प्रोसेसर कमी रॅमसह देखील चांगला स्पीड देतो. जर फोनचा प्रोसेसर जुना असेल तर सोबत जास्त रॅम आवश्यक आहे. जर तुम्ही फोन दीर्घकाळ वापरणार असाल तर तुमच्यासाठी ६ जीबी रॅम बेस्ट ठरेल.
- जास्त रॅममुळे फोनचे नुकसान : विशेष म्हणजे जितका जास्त रॅम तितकची फोनची किंमत वाढते. तसेच जास्त जीबी रॅम असलेल्या फोनची बॅटरी लवकर डिस्चार्ज होते. फोनची देखील यात महत्वाची भूमिका आहे. त्यामुळे युजर्सना जास्त जीबी स्टोरेज असलेला स्मार्टफोन खरेदी केला पाहिजे.
- वर्चुअल रॅम म्हणजे काय? : वर्चुअल रॅम म्हणजे फोनला जेव्हा हवं तेव्हा अतिरिक्त रॅमची ताकद देणं. परंतु यासाठी फिजिकली रॅम जोडला जात नाही तर इंटर्नल स्टोरेजचा वापर केला जातो. याला वेगवेगळ्या कंपन्यांनी वेगवेगळी नावं दिली आहेत. उदाहरणार्त सॅमसंग 'रॅम प्लस', रियलमी 'डायनॅमिक रॅम' आणि विवो 'वर्चुअल रॅम' म्हणते.

## शॉर्ट न्यूज

### कर्मचाऱ्याचा अर्धनग्न अवस्थेत गोंधळ

**संगमनेर :** नगरपालिकेत काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याने मद्याच्या धुंदीमध्ये अर्धनग्न अवस्थेत नगरपालिका कार्यालयात गोंधळ घातला. हा कर्मचारी एका माजी नगराध्यक्षांचा सख्खा भाऊ आहे. या कर्मचाऱ्याने घातलेल्या गोंधळाच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाने नगरपालिका कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करून त्या कर्मचाऱ्याविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली आहे. संगमनेर नगरपालिकेच्या एका कर्मचाऱ्याने हे कृत्य केले आहे.

### कुस्ती ग्रामीण भागाची ओळख

**पारनेर :** कुस्ती ही खऱ्या अर्थाने ग्रामीण भागाची ओळख आहे ग्रामीण भागामध्ये कुस्तीला महत्त्व असून कुस्ती स्पर्धेच्या माध्यमातून ग्रामीण भागात अनेक पैलवान खेळाडू तयार होतात असे मत वारणवाडी गावचे सरपंच संजय काशीद यांनी व्यक्त केले. तालुक्यातील वाराणवाडी, कामटवाडी येथे हांडेवाडा या ठिकाणी मुक्ताई देवी यात्रेनिमित्त कुस्त्यांचा आखाडा भरवण्यात आला होता. यावेळी पारनेर, जुन्नर, संगमनेर या भागातून कुस्तीपटू हगाम्यासाठी या ठिकाणी आले होते.

### भंडारदरा धरण पूर्ण क्षमतेने भरले

**अकोले :** भंडारदरा परिसरात पावसाने जोरदार कमबॅक केले असून शनिवारी सकाळपासून मुसळधार पाऊस पडत असल्याने निळवंडे व भंडारदरा धरण क्षेत्रात झपाट्याने पाणी वाढ झालेली असून ११०३९ दलघफू क्षमतेचे भंडारदरा धरण १०० टक्के भरले असल्याचे जाहीर केले. धरणातून टप्प्याटप्प्याने पाणी सोडण्यात आले होते. तर धरणातून स्पिलवे ने २२९७६ क्युसेक्स पाण्याचा एकूण २३८०६ क्युसेक्सने सोडण्यात आला होता. सर्व छोटे पूल पाण्याखाली गेले असून या पुलावरून कोणीही प्रवास करू नये, काळजी घ्या, सतर्क रहा असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### नगरमध्ये चैन स्नॅचिंग करणारा गजाआड

**नगर :** तोफखाना पोलिसांनी चैन स्नॅचिंग करणाऱ्या आरोपीला गजाआड केले आहे. परवेझ जावेद मणियार असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून एकूण १ लाख ९५ हजार रुपये किमतीचे सोने हस्तगत करण्यात आले आहे. पहिल्या प्रकरणात, सुजाता राहुल अष्टेकर रा. पाईपलाईन रोड या त्यांचे घराकडून पाईपलाईन रोडकडे पायी जात असताना त्यांचे गळयाती पावनेदोन तोळे सोन्याचे गंठण बळजबरीने हिसकावून नेल्याची फिर्यादी दाखल करण्यात आली होती.

# झेडपीवर धडकला पोषण आहार कर्मचाऱ्यांचा मोर्चा

## शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी



**नगर : प्रतिनिधी**

**श्रमिक मजदूर संघ शालेय पोषण आहार कर्मचारी संघटनेतर्फे शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित समस्या सोडवा, या मागणीसाठी जिल्हा परिषदेवर संघर्ष मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात जिल्ह्यातील पोषण आहार कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**

या आंदोलनात संस्थापक अध्यक्ष महेंद्र विधाते, राज्य उपाध्यक्ष कविता धिवारे आदी उपस्थित होते.मार्केटयार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन मोर्चाची सुरुवात करण्यात आली. जुने बसस्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करुन मोर्चा जिल्हा परिषदेवर धडकला. पोषण आहार कर्मचाऱ्यांनी केलेल्या जोदरार घोषणाबाजी झेडपीचा संपूर्ण परिसर दणाणून निघाला. सर्व कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे, शासकीय सेवेत सामावून घेत नाही, तोपर्यंत किमान वेतन कायद्याप्रमाणे १५ हजार रुपये मानधन द्यावे, आदी मागण्या करण्यात आल्या.

# लाडकी बहीणचा अर्ज भरायला जाताना चार जण वाहून गेले

## काठावरील महिलांनी तिघांना वाचवले एक महिला बेपत्ता



**साक्री : प्रतिनिधी**

**लाडकी बहीण योजनेचा अर्ज करण्यासाठी जाणारे चार जण धुळे जिल्ह्यातील कान नदीच्या पुरात वाहून गेल्याची घटना मंगळवारी सकाळी घडली. त्यातील दोन पुरुष व एका महिलेला काठावरच्याच महिलांनी साडी टाकून वाचवले तर एक महिला बेपत्ता झाली. दुसऱ्या एका घटनेत साक्री तालुक्यात पांझरेच्या पुरात तरुण वाहून गेला असून त्याचा शोध सुरू आहे. साक्री तालुक्यात दोन ते तीन दिवस जोरदार पाऊस झाल्याने नदी- नाल्यांना पूर आला आहे.**

साक्री तालुक्यातील मालनगाव प्रकल्पातून कान नदीत पाणी सोडले आहे. त्यामुळे पूर आला आहे. विजयपूर येथील सीताराम काशीराम सुळ, गोजरबाई सीताराम सुळ, देवा काळू वयकर आणि गोजरबाई देवा वयकर हे मंगळवारी लाडकी बहीण योजनेचा अर्ज भरण्यासाठी अष्टाणे येथे निघाले होते. उशीर होईल म्हणून जवळच्या रस्त्याने चौघे कान नदीच्या पात्रातून जात होते. मात्र, पाण्याचा प्रवाह अधिक असल्याने चौघे वाहू लागले. या वेळी नदीकाठावर काही महिला कपडे धूत होत्या. त्यांनी धुतलेल्या साड्या चौघांपर्यंत फेकल्या. एक महिला आणि पुरुष ही साडी पकडून काठावर आले. अन्य दोघे वाहून जात असताना एका तरुणाने नदीत उडी घेत एकाला वाचवले. तर गोजरबाई देवा वयकर ही महिला वाहून गेली.

दुसऱ्या घटनेत, मालपूर (ता. साक्री) येथील दगाजी बच्छाव हा तरुण कासारे येथील पांझरा नदीच्या किनाऱ्यावर असलेल्या महादेव मंदिराच्या पुलावरून नदीत पडला- त्याला बेल्टच्या साहाय्याने वाचवण्याचा प्रयत्न काही जणांनी केला. पण त्यात यश आले नाही.

# श्रीगोंद्यात ओल्या दुष्काळाचे संकट

■ खरीप धोक्यात शेतकरी अडचणीत ■ सततच्या पावसाचा पिकांवर परिणाम ■ नुकसानीच्या पंचनाम्यांकडे दुर्लक्ष

**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसांपासून तालुक्यात ढगाळ वातावरण असून, वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. त्यात दररोज रिमझिम पावसाच्या सरी बरसत आहेत. वातावरणातील या बदलामुळे नागरिकांच्या आरोग्यासह खरिपाच्या उभ्या पिकांवर मोठा दुष्परिणाम झाला आहे. दरम्यान, हवामान विभागाच्या अंदाजानुसार आणखी दोन ते तीन दिवस मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आल्याने ओल्या दुष्काळाचे संकट उभे राहिले आहे. खरीप हंगामातील उत्पन्नाबाबत मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

यंदा पावसाळा सुरू झाल्यापासून रोज पाऊस होत आहे. खरीप हंगामातील पिकांसाठी असे वातावरण पोषक नसल्याचे शेतकरी सांगतात. त्यात गेल्या आठ दिवसांपासून सूर्यदर्शनच झालेले नाही. त्यामुळे खरिपाची हातातोंडाशी आलेली पिके या अतिवृष्टीमुळे भूईसपाट होतात की काय? अशी शंका शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. सध्या खरिपातील पिकांची काढणी सुरू झाली आहे. मात्र, सततच्या पावसाने बाजरी कपाशी, उडीद, तुर, उत्पन्नाची मका, मूग आदी पिकांवर अतिपावसाचा परिणाम झाला आहे. त्यातून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. चालू वर्षी वेळेत पावसाने हजेरी लावल्याने खरिपातील पिके जोमात होती, परंतु सततच्या पावसाने काटणीला आलेली बाजरी अक्षरशा भूईसपाट झाली आहे.

कपाशीची पाने पिवळी पडले आहेत. कपाशीच्या पाकळ्या गळून जात आहे. पिकात मोठ्या प्रमाणात तण झाले असून,



ते काढण्यासाठी मजूर मिळत नाही. शेतात चिखल असल्याने मजूरही कामावर येत नाहीत. त्यामुळे भरघोस उत्पन्नाची आशा मावळताना दिसत आहे.दरम्यान, अनेक शेतकऱ्यांनी यंदाच्या हंगामातही एक रुपयात पीकविमा भरला आहे. अनेक शेतकऱ्यांनी कृषी अधिकारी व कृषी सहाय्यकांना संपर्क साधून पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी केली, परंतु कृषी विभागाकडून पंतप्रधान कृषी विमा फ्री टोल क्रमांक १४४४७ यावर संपर्क साधण्यास सांगितले जाते. मात्र, हा क्रमांक सतत व्यस्त असतो.

नुकसानीचे पंचनामे होत नसल्याने पीकविमा उतरूनही भरपाई मिळण्याची शक्यता दिसत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

**नुकसानीचे पंचनामे करा**

खरिपातील पिके काढणीला आली आहेत. मात्र, सततच्या पावसाने या पिकांची काढणी रखडली आहे. मुगाच्या शेंगा, बाजरीच्या कणसाला शेतातच मोड फुटले आहेत. कपाशीचे पीक पिवळे पडू लागले आहे. सततच्या पावसाने शेतात मोठ्या प्रमाणात तण झाले असून, त्यासाठी मजूर मिळत नाहीत. कृषी व महसूल विभागाने तातडीने नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई देण्याची गरज आहे.

# वसंतराव नाईक महामंडळाचा व्यवस्थापक गजाआड

## लाचलुचपतच्या पथकाची कारवाई

**नगर : प्रतिनिधी**

**येथील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचा व्यवस्थापक दत्तू सांगळे याला साडेपाच हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या नगर येथील पथकाने ही कारवाई केली.**

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाकडून इलेक्ट्रॉनिक व्यवसायासाठी तक्रारदाराला कर्ज हवे होते. ही कर्जाची रक्कम मंजूर करून देण्यासाठी दत्तू सांगळेने साडेपाच हजार रुपयांची लाच मागितली. ही लाच स्वीकारताना त्याला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने आज रंगेहाथ पकडले. आरोपीसांगळे विरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(पान १ वरून)

## प्रा.मधुकर राळेभात यांचा राष्ट्रवादीला रामराम!

शिवसेनेचं काम केले. त्यानंतर मी राष्ट्रवादीत प्रवेश केला. रोहित पवारांना निवडून आणण्यासाठी आम्ही जीवाचं रान केले. रोहित पवारांची काम करण्याची पद्धत आणि कार्यकर्त्यांसोबत जे वागणं आहे ते मला पसंत पडलं नाही. त्यांनी कार्यकर्त्यांना दुय्यम वागणूक दिली. त्यामुळे मी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला, अशी टीका राळेभात यांनी केली.

आपण कोणत्या पक्षात जाणार हे राळेभात यांनी अद्याप स्पष्ट केलेले नाही. अशातच आता भाजपचे विधान परिषदेचे आमदार राम शिंदे यांनी राळेभात यांना पक्षात येण्याची खुली ऑफर दिली आहे. शिंदे यांनी म्हटले आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार ) पक्षाचा कर्जत जामखेड विधानसभा प्रमुख व प्राथमिक सदस्य पदाचा राजीनामा दिल्यानंतर जेष्ठनेते प्रा मधुकर राळेभात यांनी भाजपात येण्याचे निमंत्रण देत आहे. जेष्ठ नेते प्रा मधुकर राळेभात यांनी दोन दिवसापुर्वी पत्रकार परिषद घेवुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिल्याची घोषणा केली. आमदार रोहित पवारांच्या हुकूमशाही विरोधात व कार्यपध्दतीवर सडकुन टीका केली होती.

# साईबाबा समाधी मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा




**शिर्डी : प्रतिनिधी**

**श्री गोकुळाष्टमी उत्सवानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या साईबाबा समाधी मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. श्री साईबाबा समाधी मंदिरातील स्टेजवर सोमवारी (२६ ऑगस्ट) रात्री १० वाजता प्रज्ञा देशपांडे, पळसोदकर, पुणे यांचे कीर्तन झाले. त्यानंतर श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व उपमुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे, मंदिर प्रमुख विष्णू थोरात, ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर श्रींची शेजारती झाली.**

मंगळवारी सकाळी १० वाजता गोकुळाष्टमी उत्सवानिमित्त गेट क्रमांक तीनसमोरील श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडपाचे स्टेजवर प्रज्ञा देशपांडे पळसोदकर यांचे कीर्तन झाले. नंतर १२ वाजता साईबाबांचे समकालीन भक्त तात्या पाटील कोते यांचे वंशज परिवारातील सदस्य सर्जेराव अशोकराव कोते यांच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, मंदिर विभागप्रमुख विष्णू थोरात, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, संरक्षण अधिकारी रोहिदास माळी, मंदिर पुजारी, कर्मचारी, शिर्डी ग्रामस्थ आणि साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या वतीने आयोजित श्री गोकुळाष्टमी उत्सव भक्तीमय वातावरणात पार पडला.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2



डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ

● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)

● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरुन पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार

● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार

● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)

पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच



मेजर भगवान नांगरे सर

आमची वैशिष्ट्ये
- १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
- एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
- प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
- मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
- अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
- PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
- पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर

ॲडमिशन ओपन

9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# मुंगशीच्या सरपंचपदी मोनिका दगाबाज बिनविरोध

## अनिल करपे, विकास दगाबाज यांच्या नेतृत्वात ग्रामपंचायत वर एकहाती सत्ता



(छाया - शरद रसाळ, सुपा)

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील मुंगशी येथील वैशाली राजेंद्र शिंदे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त असलेल्या सरपंच पदी मोनिका शिवाजी दगाबाज यांची बिनविरोध निवड झाली.**

पॅनल प्रमुख माजी सरपंच अनिल करपे व खा. निलेश लंके यांचे समर्थक विकास दगाबाज यांच्या नेतृत्वात ग्रामपंचायत मध्ये सत्ता आहे. ग्रामपंचायत सरपंच पदाचा कार्यकाल ठरवण्यात आला ठरलेल्या सव्वा वर्षाचा कालावधीत पूर्ण झाल्यानंतर वैशाली राजेंद्र शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला त्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी निवडणूक घेण्यात आली यावेळी अध्यासी अधिकारी सुरेश जेठे यांनी व सहाय्यक अधिकारी बळीराम शेटेवाड यांनी काम पाहिले.

निवडणुकीसाठी पाच सदस्य उपस्थित होते तर दोन सदस्य अनुपस्थित राहिले मोनिका दगाबाज यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. अनिल करपे व विकास दगाबाज यांनी या कामी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

यावेळी वामनराव थोरात राजेंद्र शिंदे उपसरपंच शिल्पा थोरात गोरख करपे संतोष करपे सर्जेराव दगाबाज विकास शिंगोटे तात्याभाऊ दागाबाज अशोक काळे शिवाजी शिंगोटे आदी उपस्थित होते.

नवनिर्वाचित सरपंच मोनिका दगाबाज यांचे खा.निलेश लंके माजी.जि. प. सदस्य राणीताई लंके यांनी अभिनंदन केले आहे.


> **ग्रामपंचायत मध्ये माजी सरपंच अनिल करपे खा. नीलेश लंके समर्थक विकास दगाबाज यांच्या पुढाकारातून व मार्गदर्शनाखाली गावात गेल्या साडेतीन वर्षाच्या कालावधीत कोट्यावधी रुपयाची विकास कामे मार्गी लागली आहेत भविष्यात सर्वांना सोबत घेऊन गावातील विकासाचा गाडा पुढे नेला जाईल.**
>
> **मोनिका दगाबाज**
> **नवनिर्वाचित सरपंच मुंगशी.**

# पठारवाडी ग्रामपंचायतचे विकासाभिमुख कामे लोकाभिमुख

## दिपक आण्णा लंके यांचे प्रतिपादन

**निघोज : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील पठारवाडी ग्रामपंचायत कारभार सक्षम व कार्यक्षमपणे सुरू असून विकासाभिमुख कामांना लोकाभिमुख साथ मिळत असल्याने विकासकामे मोठ्या प्रमाणात सुरू असून खासदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही दिपक आण्णा लंके यांनी दिली आहे.**



■ पठारवाडी परिसरात होत असलेल्या विकासकामांची पाहणी करीत दिपक आण्णा लंके व माजी सभापती सुदाम पवार यांनी पदाधिकारी व ग्रामस्थ यांना मार्गदर्शन केले. ( छायाचित्र - रोहन उनवणे निघोज )

ग्रामपंचायतीच्या वतीने १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून गावात विविध विकास कामांचे उद्घाटन करण्यात आले यामध्ये गावामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, शाळांसाठी इंटरएक्टिव्ह व्हाईट डिजिटल बोर्ड तसेच सौरपॅनल व ब्लॉक बसवणे तसेच गांव अंतर्गत रास्ते दुरुस्ती,कचरा कुंडी वाटप,सांडपाणी व्यवस्थापन विविध विकासकामांचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी लंके व माजी सभापती सुदाम पवार यांनी ग्रामपंचायतला भेट दिली तसेच विविध विकासयोजनांची माहिती घेऊन विविध ठिकाणी भेटी दिल्या यावेळी लंके बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ नेते व बाजार समितीचे संचालक किसनराव सुपेकर, सरपंच उर्मिला सुपेकर,उपसरपंच भिकाजी पठारे,माजी उपसरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य दौलतराव सुपेकर, माजी सरपंच भास्कर सुपेकर,ग्रामपंचायत सदस्य शंकरराव पठारे, मारुती पठारे, सुरेखा पठारे,नंदा पवार, शारदा बोदगे तसेच सोसायटीचे चेअरमन गुलाब पठारे, व्हा. चेअरमन सिद्धेश्वर पठारे, संचालक किरण सुपेकर, पांडुरंग सुपेकर,युवा नेते कुंडलिक पठारे, माजी चेअरमन सुखदेव पठारे , ग्रामविकास अधिकारी हौशीराम देंडगे, कस्टम विभागाचे सेवानिवृत्त अधिकारी बाळासाहेब सुपेकर, महेंद्र पठारे, विवेक गोपाळे , अनिल सालके, शारदा दरेकर, शिंदे मॅडम, अंगणवाडी सेविका कविता तांबे,सीमा तांबे, निशाद मनियार,नितिन सर,ग्रा. येलप्पा तेलंग,सोमनाथ गोसावी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी उपसरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य दौलतराव सुपेकर यांनी केले यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य रामचंद्र सुपेकर महाराज यांनी आभार मानले.

> **पठारवाडी गाव धार्मिक, सामाजिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात योगदान देत असून विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात खासदार नीलेश लंके यांचे सहकार्य मिळत असल्याने विकासाभिमुख कामांना गती मिळाली आहे. पठारवाडी गावचा नावलौकिक वाढविण्यासाठी सरपंच, उपसरपंच, माजी पदाधिकारी, सोसायटीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष संचालक मंडळ आदी चांगल्या प्रकारे काम करीत असून ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांचे सहकार्य सातत्याने मिळत असल्याने येत्या पाच वर्षांत गाव व परिसरात मोठा विकासाभिमुख बदल होणार आहे.**
>
> **दौलतराव सुपेकर**
> **माजी सरपंच**
> **रामचंद्र सुपेकर**
> **सेवानिवृत्त प्राचार्य**

# पाडळी रांजणगावच्या युवकास राहुरीत अटक

## ■ तरुणीचे अपहरण प्रकरण ■ शिरूरवरून घेतले ताब्यात



**राहुरी: प्रतिनिधी**

**तालुक्यातील पूर्व भागातील अल्पवयीन मुलीस आमिष दाखवून अपहरण करणाऱ्या पारनेर तालुक्यातील पाडळी रांजणगाव येथील १९ वर्षीय तरुणास राहुरी पोलिसांनी २७ ऑगस्ट रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास शिरूर बस स्थानक परिसरातून अटक केली आहे.पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी याबाबत माहिती दिली आहे.**

२७ ऑगस्ट रोजी अल्पवयीन मुलगी ही कॉलेजला गेली असता घरी परतली नव्हती याबाबत राहुरी पोलीसात अपहरण बाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपास सुरू केला असता पोलिसांना मिळाला गोपनीय माहितीनुसार विशाल विठ्ठल निकम (वय १९ राहणार रांजणगाव पाडळी, ता.पारनेर याने) अल्पवयीन मुलीस शिरूर येथे अपहरण करून नेले असून तेथून तो तिला मजुरीसाठी सोलापूर येथे घेऊन जाणार असल्याची माहिती मिळाली त्यानुसार राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी पथक तयार करून शिरूर पोलीस स्टेशन हद्दीत पथक रवाना केले.

२७ ऑगस्ट च्या १० वाजता आरोपी विशाल निकम यास अटक केली असून अल्पवयीन मुलीची सुटका करून तिला पालकांच्या ताब्यात दिले आहे.सदरची कारवाई पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चारुदत्त खोंडे, पोलीस हवालदार सुरज गायकवाड, राहुल यादव, प्रवीण बागुल ,प्रमोद ढाकणे , सतीश कुराडे, नदीम शेख सतीश ताजने, अंकुश भोसले ,इत्याकार सय्यद तसेच सचिन दनाद संतोष दरेकर यांनी केले आहे.

# काजल आंधळेची नामांकित कंपनीमध्ये निवड

## विविध संस्थांच्या वतीने सन्मान



**कर्जुले हर्या : प्रतिनिधी**

**कु. काजल आंधळे हिची जेट २ ट्रव्हल टेक्नालॉकिस्क या नामांकित कंपनीमध्ये निवड झाली. पारनेर तालुका शिक्षक संघ आणि गुरुमाऊली - सदिच्छा मंडळ अखिल शिक्षक संघ व ऐक्य मंडळ शिक्षक भारती, एकल शिक्षक मंच आणि परिवर्तन आघाडीच्या वतीने सन्मान करण्यात आला.**

कु. काजल आंधळे हीने प्राथमिक शिक्षण तसेच माध्य. शिक्षण कर्जुले हरेश्वर येथे घेतले. दहावीनंतर शासकिय तंत्रनिकेतन अहमदनगर येथे डिप्लोमा चे शिक्षण घेतले. व नंतर सा. फुले पुणे विद्यापीठातून संगणक अभियांत्रिकी पदवी शिक्षण घेतले. नंतर तिची जेट २ ट्रॅव्हल्स टेक्नालॉजी या नामांकित कंपनीत सॉफ्टवेअर डेव्हलपर या पदावर निवड झाली. काजलचे वडिल राजाराम आंधळे हे प्राथमिक शिक्षक असून आई संजिवनी आंधळे या कर्जुले हरेश्वर गावच्या मा. सरपंच आहेत. यावेळी
शिक्षक नेते बापूसाहेब तांबे, रावसाहेब रोहोकले, शिक्षक बँक संचालक कारभारी बाबर, विश्वस्त प्रल्हाद भालेकर, संदिप ठाणगे, चंद्रकांत गट, डॉ.बाळासाहेब शिंगोटे, सुरेश निवडुंगे, प्रविण ठुबे सूर्यकांत काळे उपस्थित होते.

या यशाबद्दल हरेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शिवाजीराव शिर्के, सचिव एकनाथ दाते सर, श्री हरेश्वर-शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रामदास शिंदे, सचिव बबन शिर्के, सरपंच सुनिताताई मुळे, उपसरपंच मिनिनाथ शिर्के, मा. सरपंच साहेबराव वाफारे, पंढरीनाथ उंडे व ग्रामस्थांनी तसेच श्री हरेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक मधुकर बर्वे सर तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

# भुकन वस्ती परिसरात विकासाची मोठी कामे

## सचिन वराळ पाटील यांचा सन्मान

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज आणि परिसरात विकासकामे करताना संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष व निघोज ग्रामपंचायतचे सर्वेसर्वा सचिन वराळ पाटील यांनी भुकन वस्ती परिसरात गेली पाच वर्षात जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे केल्याने त्यांना भुकन वस्ती परिसरातील संत सावता मंदीर परिसरात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात भुकन वस्तीकडून सत्कार करुण सन्मानित करण्यात आले.**



यावेळी उपस्थित भुकन वस्ती परिसरातील ज्येष्ठ व युवक मंडळीनी आपल्या भावना व्यक्त करताना सचिन पाटील यांच्या विषयी गौरवोद्गार व्यक्त करीत त्यांचा सन्मान केला. यावेळी पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे शहराध्यक्ष आनंद भुकन, विठ्ठल भुकन ,आबाजी भुकन, माजी उपसभापती व समता परिषदेचे जिल्हा पदाधिकारी खंडू भुकन, लहू लंके , गंगाराम भुकन, गोवींद मंदीलकर, जी एस महानगर बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी कैलास भुकन, धर्मनाथ भुकन , संतोष भुकन , भरत शेटे , ग्रामपंचायतचे माजी सदस्य शिवाजी भुकन , शंकर भुकन, नाथा भुकन , भाऊ भुकन , बन्सी डोके, सागर अनंत , जीतेंद्र काळे, विनायक अनंत, रमेश लंके , लक्ष्मण शेटे, प्रवीन भुकन, सुधीर भुकन, शरद भुकन , सावता भुकन, गणेश भुकन, लहू भुकन, दत्तात्रय भुकन, रामदास भुकन , निलेश भुकन, नारायण भुकन , जय भुकन , नितीन भुकन आदी तसेच महिला भगीनी व ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी गेली पाच दिवसांपासून सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात परिश्रम व लोकसहभागातून सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांचा पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे शहराध्यक्ष आनंद भुकन, माजी उपसभापती व जिल्हा समता परिषदेचे प्रमुख पदाधिकारी खंडू भुकन, जी एस महानगर बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी कैलास भुकन, ग्रामपंचायतचे माजी सदस्य तसेच संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे मार्गदर्शक शिवाजीराव भुकन यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्या

## अन्यथा शाळेची मान्यता रद्द



**नगर : प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे गरजेचे आहे. विद्यार्थी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून जिल्ह्यातील सर्वच प्राथमिक, उच्च प्राथमिक आदी शाळांमधे येत्या महिनाभरात सीसीटिव्ही कॅमेरे न बसवल्यास त्या संबंधित शाळेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात येईल, असा इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी दिला.**

जिल्हा परिषद प्रशासनाची विद्यार्थी सुरक्षेसाठी नुकतीच बैठक पार पडली. यावेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अशोक कडूस आदी उपस्थित होते. शाळेत सीसीटिव्ही कॅमेरे बसवल्यानंतर मुख्याध्यापकांनी ठराविक वेळेनंतर फुटेज तपासणे देखील आवश्यक आहे. तपासणीदरम्यान फुटेजमध्ये काही आक्षेपार्ह बाबी दिसून आल्यास संबंधितावर कार्यवाही करण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांची किंवा शाळा व्यवस्थापन समितीची असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.

# डी.बी.एम.शाळेमध्ये बालगोविंदांची एकच धमाल!

## मुलींच्या मनोरे पथकाने फोडली दहीहंडी

**राळेगण सिध्दी : प्रतिनिधी**

**डी.बी.एम.शाळेमध्ये एकीकडे शहरात श्रीकृष्ण जन्मष्टमीच्या निमित्ताने लाखमोलाच्या दहीहंडी फोडण्याच्या शर्यती सुरू असतानाच पारनेर तालुक्यातील डीबीएम शाळेतील बालगोपालांनी मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडली. यावर्षी दहीहंडी फोडण्याचा मान विद्यार्थिनींच्या गोपिका पथकाने पटकावला.**



■ राळेगणसिद्धी ता.पारनेर येथील डी.बी.एम.शाळेतील मुलींच्या मनोरे पथकाने यावर्षी दहीहंडी फोडली. (छाया - शरद रसाळ, सुपा)

याप्रसंगी इयत्ता दहावीच्या कुमारी तन्वी शेळके हिने श्रीकृष्ण जन्माष्टमी विषयी माहिती दिली तर विद्यार्थ्यांनी श्रीमद् भगवद्गीता, प्राचीन संस्कृत, ब्रजभाषा, गुरुकुल इत्यादींचे महत्त्व विशद करणारे नाटक सादर केले. तसेच विद्यालयाच्या शिक्षिका रोकडे मॅम, ढोरमले मॅम यांनी भजन तसेच गवळणी गायल्या. श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने बाळकृष्णाच्या पाळण्याचे पूजन मुख्याध्यापिका सौ. शितल मापारी यांनी केले.

यंदाच्या वर्षी मानवी मनोर यांचे तीन थर लावत दहीहंडी फोडली ती गोपिका पथकाने. सौ. कळमकर मॅम, अबॅकस एव्हरेस्ट अकॅडमी यांनी या गटास १००१ रुपये रोख बक्षीस दिले. सर्व विद्यार्थ्यांना दहीहंडीच्या प्रसादाचे वाटप करण्यात आले. दहीहंडी फोडल्यानंतर सर्व बालगोपालांचे पाय रासलीलेच्या नादावर थिरकु लागले. इयत्ता पहिली ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी यावेळी एकत्र येऊन भोजन करत भजने गायली. गोपाल काल्याचा खरा अर्थ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री.जे.डी.मापारी सर यांनी या समभोजनाच्या संकल्पनेतून दाखवून दिला. तसेच संघभावना, सर्वधर्मसमभाव, प्रोत्साहन, जबाबदारीची जाणीव, सर्वसमावेशकता अशी पंचसूत्री सर्व विद्यार्थ्यांमध्ये रुजावी हा या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे सरांनी स्पष्ट केले.

याप्रसंगी बोलताना या उत्सवाचे बदलते रूप यावर भाष्य करत काय करावे व काय टाळावे याबाबत देखील मार्गदर्शन यावेळी त्यांनी केले.
या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. नेहा चिपाडे हिने केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# मळगंगा ट्रस्ट सुरु करणार अन्नछत्र

## उपकार्याध्यक्ष वसंत कवाद यांची माहिती

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज आणि परिसरातील राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी निघोज येथे लवकरच अन्नछत्र सुरु करण्यात येणार असून याठिकाणी भाविक व गोरगरीब जनतेला माफक दरात अन्नदान करण्याची व्यवस्था करणार असल्याची माहिती मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद सर यांनी दिली आहे.**



■ मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टला देणगी देणारे राहुल लामखडे व शांताराम लामखडे यांचा सत्कार मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद सर यांच्या हस्ते करण्यात आला.

कै. बबन श्रीपत लामखडे यांच्या स्मरणार्थ राहुल लामखडे व शांताराम लामखडे यांनी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टला परिसर विकासासाठी ११ हजार १११ रुपयांची देणगी दिली यावेळी ट्रस्ट उपकार्याध्यक्ष वसंत कवाद सर , सचिव शांताराम कळसकर, विश्वस्त शंकरराव लामखडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी ते बोलत होते. यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त तसेच शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल शेटे, ट्रस्ट विश्वस्त रोहिदास लामखडे, बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय लंके आदी मान्यवर तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

कवाद सर यावेळी म्हणाले मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कार्याध्यक्ष शांताराम लंके यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनखाली ट्रस्ट पदाधिकारी व विश्वस्त मंडळ तसेच ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ मोठ्या प्रमाणात विविध उपक्रम राबवीत आहेत. ग्रामस्थ, मुंबईकर मंडळ व राज्यातील भावीक नेहमीच आर्थिक सहकार्य करीत ट्रस्ट परिसर विकास, तिर्थक्षेत्र मळगंगा मंदीर परिसर विकास तसेच जगप्रसिद्ध रांजणखळगे पर्यटन परिसर व मंदिर परिसर विकासासाठी मोठ्या प्रमाणात देणग्या देऊन लोकसहभाग देत आहेत. राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी तसेच अधिकारी मोठ्या प्रमाणात सहकार्य करीत असून सरकारच्या निधीतून विकास कामे झाली आहेत तसेच यापुढील काळात मोठ्या प्रमाणात विकासकामे कशी होतील यासाठी आम्ही सर्व प्रयत्नशील आहोत अशी माहिती कवाद सर यांनी दिली आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वस्त शंकरराव लामखडे यांनी केले शेवटी विश्वस्त रोहिदास लामखडे यांनी आभार मानले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com